नवराष्ट्र

Jalgaon | 27 July 2026 | Page 2



# ‘सायबर वारकरी’ संकल्पनेतून जागर!

## आषाढी एकादशीनिमित्त मुक्ताईनगरात शेकडो वारकऱ्यांमध्ये केले जनजागृतीचे कार्य

▶ मुक्ताईनगर (वा.) आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सच्या क्विक हील सायबर वॉरियर क्लबतर्फे, क्विक हील फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने संत मुक्ताबाई मंदिर, मुक्ताईनगर येथे एक आगळावेगळा सायबर जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. वारकरी परंपरा आणि आधुनिक डिजिटल सुरक्षेची सांगड घालत सादर करण्यात आलेल्या या उपक्रमाने उपस्थित वारकरी आणि भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

या उपक्रमात स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सच्या २० सायबर वॉरियर्सनी उत्साहाने सहभाग घेतला. सर्व स्वयंसेवकांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान केली होती. यामध्ये एका विद्यार्थ्याने भगवान श्री विठ्ठल तर एका विद्यार्थिनीने माता रुक्मिणी यांची वेशभूषा साकारून वारकरी संप्रदायाचे आकर्षक दर्शन घडविले. सायबर वारकरी ही अभिनव संकल्पना प्रत्यक्षात साकारत विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेचे संदेश देणारे पोस्टर्स, फलक आणि विशेष कॅप्सच्या माध्यमातून जनजागृती केली.आषाढी एकादशी निमित्त आलेल्या तीन वेगवेगळ्या पालख्यांसमोर नृत्य आणि पथनाट्य सादर केले. पथनाट्यामधून ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, ओटीपी फसवणूक, बँकिंग आणि यूपीआय फसवणूक, सोशल मीडिया गैरवापर तसेच डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी याबाबत प्रभावी संदेश दिला.



### मनोरजनातून प्रबोधन; फसवणूक टाळण्याचा संदेश

मनोरंजनातून प्रबोधन हा उद्देश ठेवून सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला. उपक्रमादरम्यान सायबर वॉरियर्सनी वारकऱ्यांमध्ये प्रत्यक्ष जाऊन त्यांच्याशी संवाद साधला. मोबाईलचा सुरक्षित वापर, सायबर गुन्हे टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी, ओटीपी, पासवर्ड किंवा बँक खात्याची माहिती कोणालाही न देणे, संशयास्पद लिंकवर क्लिक न करणे आणि ऑनलाइन फसवणुकीपासून स्वत:चे संरक्षण कसे करावे याबाबत त्यांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. वारकऱ्यांच्या शंकांचे समाधान करत त्यांना डिजिटल सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

### उपस्थित सर्वांना करण्यात आले सायबर सेफ कार्डचे वाटप

यावेळी उपस्थित वारकरी आणि भाविकांना 'सायबर सेफ कार्डचे वाटप करण्यात आले. या कार्डसमध्ये सायबर सुरक्षेसंदर्भातील महत्त्वाच्या सूचना, खबरदारीचे उपाय आणि आपत्कालीन संपर्काची माहिती देण्यात आली होती. अनेक वारकऱ्यांनी ही माहिती जतन करून ठेवत विद्यार्थ्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

जनजागृती अधिक प्रभावी व्हावी यासाठी विविध मनोरंजक आणि सहभागात्मक उपक्रम आयोजित करण्यात आले. सायबर सुरक्षेवरील प्रश्नोत्तरे, छोटेखानी खेळ, संवादात्मक कृती आणि प्रत्यक्ष सहभागातून नागरिकांना सायबर सुरक्षिततेबाबत जागरूक करण्यात आले. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यामुळे संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण आणि आनंददायी बनले.

### क्विक हील सायबर वॉरियर क्लबचा स्तुत्य उपक्रम

- या अभिनव उपक्रमाद्वारे ५०० हून अधिक वारकरी आणि भाविकांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचविण्यात आला. विशेष म्हणजे, पारंपरिक वारकरी संस्कृती आणि आधुनिक सायबर सुरक्षेचा विषय यांची सांगड घालणारी ही संकल्पना अनेकांसाठी आकर्षणाचा विषय ठरली.
- उपस्थितांनी विद्यार्थ्यांसोबत छायाचित्रे काढली, त्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले आणि अशा प्रकारची जनजागृती समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याची भावना व्यक्त केली.
- परंपरा, संस्कृती आणि तंत्रज्ञान यांचा सुंदर संगम घडवून समाजात डिजिटल सुरक्षिततेची जाणीव निर्माण करण्याचा हा प्रयत्न अत्यंत यशस्वी ठरला. युवकांनी सामाजिक बांधिलकी जपत नाविन्यपूर्ण पद्धतीने सायबर जनजागृती करण्याचा आदर्श या उपक्रमातून घालून दिला.
- भविष्यातही अशाच सर्जनशील आणि प्रभावी माध्यमांतून समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती करण्याचा संकल्प क्विक हील सायबर वॉरियर क्लबच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

## साकडे ● आमदार पाटलांची बळीराजाच्या समृद्धीसाठी प्रार्थना